# दि संगमनेर मर्चंटस को- ऑपरेटिव्ह बँक लि.संगमनेर

**मुख्य कार्यालय : इंदिरा गांधी मार्ग,पोस्ट बॉक्स नं.१३,संगमनेर ४२२६०५**

**रजि.नं.ए.एन.आर/ बी.एन.के.-१०७(२६/११/१९६५)**

**बँकिंग लायसेंस नं.:युबीडी/एमएच/५००पी (०८/०८/१९८६)**

**स्थापना - १६ मे १९६६**

**पोटनियम (बाय -लॉज )दुरुस्ती**

| अ.नं. | उपविधीचा अनुक्रमांक | **सध्याच्या उपविधीची शब्दरचना** | **दुरुस्ती झाल्यानंतर होणारी उपविधीची शब्दरचना** | **दुरुस्तीचे कारण** |
|---|---|---|---|---|
| १ | | ह्या बँकेचे नांव दि संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, संगमनेर असे राहील. | | |
| २ | | या बँकेचा नोंदवलेला कार्यालयीन पत्ताः-संगमनेर -४२२ ६०५,जि.अहमदनगर या प्रमाणे राहील.यात कोणताही बदल करण्यात आला तर तो वृत्तापत्रात जाहीर करण्यात येईल,तसेच असा बदल झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत त्याबाबत नोंदणी अधिकांऱ्याकडे कळविण्यात येईल. (वा.सा.सभा.दि.०१/११/८८) (मंजूर आदेश ९/१२/८८) | या बँकेचा नोंदवलेला कार्यालयीन पत्ता- इंदिरा गांधी मार्ग,पोस्ट बॉक्स नं.१३,संगमनेर ४२२६०५ जि.अहमदनगर यात कोणताही बदल करण्यात आला तर तो वृत्तपत्रात जाहिर करण्यात येईल,तसेच असा बदल झालेले दिवसापासून ३० दिवसाचे आत त्याबाबत नोंदणी अधिकाऱ्यांकडे कळविण्यात येईल. | तपशीलवार पत्ता समजण्यासाठी |
| ३ | | ह्या बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर, नाशिक, पुणे, औरंगाबाद हे जिल्हे राहतील. कार्यक्षेत्रात बदर करावयाचा झाल्यास सहकार खात्याची व रिझर्व्ह बँकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील. (मंजूर आदेश २६/०३/२००९) | ह्या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील. | बँकेने शाखा विस्तार करण्याचे उद्दीष्ट ठेवल्याने कार्यक्षेत्र वाढविणे. |
| ४ | १ | **व्याख्याः-** या पोटनियमात जथे जेथे कायदा व नियम असे उल्लेख करण्यात आलेले आहेत तेथे तेथे तो महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्यात वेळोवेळी होणारे बदल तसेच त्यानुषंगाने तयार करण्यात आलेले नियम असा अर्थ समजला जाईल. | | |
| | २ | “सरकार ” म्हणजे महाराष्ट्र शासन होय. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३ | ''निबंधक ''म्हणजे महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला ''सहाकारी संस्थांचा निबंधक''ही व्यक्ती होय. | | |
| | ४ | ''सभासद ''म्हणजे बँकेचे नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर ज्याच सभासदत्व स्विकारले आहे अशी व्यक्ती ज्यात ''नाममात्र '' व ''सहभागी ''सभासदांचाही समावेश आहे. | ''सभासद ''म्हणजे बँकेचे नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर ज्याच सभासदत्व स्विकारले आहे अशी व्यक्ती ज्यात ''नाममात्र '' व ''सहभागी'' तसेच क्रियाशील सभासद यांचा समावेश आहे. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| | ५ | '' नाममात्र''सभासद म्हणजे या पोटनियमातील क्र.१० चे तरतुदीनुसार जिचे सभासदत्व बँकेने स्विकारले असेल अशी व्यक्ती. | | |
| | ६ | ''बँक ''म्हणजे दि संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि.,संगमनेर होय. | | |
| | ७ | ''पोटनियम ''म्हणजे दि संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., चे संगमनेर पोटनियम. | | |
| | ८ | मुख्य कार्यकारी अधिकारी (चिफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसर)म्हणजे संचालक मंडळाने कार्यकारी संचालक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती कार्यकारी संचालक नेमला नसेल तर संचालक मंडळाने सरव्यवस्थापक, व्यवस्थापक, किंवा सचिव म्हणून नेमलेली व्यक्ती बँकेची मुख्य कार्यकारी अधिकारी असेल. | मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणजे संस्थेतील सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी ज्याची नियुक्ती संचालक मंडळाने पगारी नोकर म्हणून केली असून हे पद सरव्यवस्थापक अथवा कार्यकारी संचालक यांचेशी समांतर राहील. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |
| | ९ | '' व्यक्ती''म्हणजे या संज्ञेत कोणीही सज्ञान प्रौढ व्यक्ती ,भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये नोंदलेली भागीदारी पेढी,मंडळी अगर अन्य कोणतीही संस्था जिची स्थापना प्रचलीत कायद्यातील तरतुदी नुसार करण्यात आली आहे. पतपेढी -जिची नोंदणी पतपेढी कायदा १८६० अन्वये झालेली आहे. राज्य सरकार ,केंद्र सरकार,सार्वजनिक विश्वस्त संस्था ज्यांची नोंदणी प्रचलीत कोणत्याही संबंधित कायद्यान्वये झालेली आहे अशा विश्वस्त संस्था यांचा समावेश असेल. | व्यक्ति म्हणजे कोणीही सज्ञान प्रौढ व्यक्ति, भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये नोंदलेली भागीदारी संस्था,अविभक्त हिंदु कुटूंब ,सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार स्थापन झालेली सोसायटी,राज्य सरकार अथवा केंद्र सरकार यांचे कायद्यान्वये स्थापन झालेली कोणतीही संस्था,सार्वजनिक विश्वस्त संस्था किंवा इतर कोणतीही प्रचलीत कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेली कंपनी. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | | **उद्देश :-** | | |
| | १ | सभासदांमध्ये काटकसर,स्ववलंबन,सहकार्याची भावना वृध्दिंगत करणे. | | |
| | २ | जनतेकडून ठेवी स्विकारणे व त्यांचा विनियोग कर्ज देण्यात अगर गुंतवणुकीत करणे.तसेच स्विकारलेल्या ठेवी मागणी करताच अगर मुदतीने परत देणे.तसेच चेक,ड्राप्ट अगर इतर पध्दतीने ठेवी परत करणे. | | |
| | ३ | कर्ज अथवा पैसा उभारणे. | कर्ज उभारणे. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |
| | ४ | सभासद व नामधारी सभासदास कर्ज अथवा उचल तारणावर अथवा तारणाशिवाय देणे. | | |
| | ५ | हस्तांतरास वर्ग करण्यास योग्य अथवा अयोग्य हुंड्या ,वचन चिठ्ठया (प्रॉमीसरी नोटस ),ड्राप्टस् कूपन्स,वसुलीसाठी आलेली बीले,रेल्वे रसीदा,हमीपत्रे ,दाखले ,वॉरन्टस, शेअर्स, डिबेंचर्स, आदी कागदपत्रे व इतर सुरक्षापत्रे काढणे स्विकारणे,विकत घेणे,विकणे,डिस्काऊंट करणे. | | |
| | ६ | हमीपत्रे (लेटर्स ऑफ क्रेडिट),प्रवासी चेक्स (ट्रॅव्हलर्स चेक्स)व सर्क्युलर नोटस् देणे व मंजूर करणे. | | |
| | ७ | विदेशी बँक चलन विकणे,विकत घेणे व विदेशी चलनाचे सर्व व्यवहार करणे. | विदेशीचलन विकणे,विकत घेणे व विदेशी चलनाचे सर्व व्यवहार करणे | अर्थ स्पष्ट होणेकरीता |
| | ८ | सर्व प्रकारच्या गुंतवणुकी,स्टॉक्स,शेअर्स,कर्जरोखे,बॉण्डस् वचनठिया करारनामे ,सिक्युरिटीज स्विकारणे,ताब्यात ठेवणे व या संबंधीचे कमिशन अंडर रायटींग आदी व्यवहार करणे. | | |
| | ९ | ग्राहकांतर्फे बॉण्डस् कर्जरोखे,वचनचिठ्या व इतर प्रकारच्या दस्तऐवज (सिक्युरिटीज)विकत घेणे,विकणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० | सर्व प्रकारचे बॉण्डस् कर्जरोखे,वचनचिठ्या व इतर प्रकारच्या मौल्यवान वस्तु ठेवीच्या स्वरुपात अथवा सुरक्षित तिजोरीत ठेवण्यासाठी स्विकारणे. | | |
| | ११ | सुरक्षित तिजोरी घर (सेफ डिपॉझीट व्हॉल्टस )व तदनुषंगिक सेवा उपलब्ध करुन देणे. | | |
| | १२ | सुरक्षा रोखे अथवा रकमांची देवाणघेवाण करणे,पाठविणे. | | |
| | १३ | कर्ज व उचलीचे व्यवहार / बोलणी करणे. | | |
| | १४ | गाहकांतर्फे हमीपत्र (गॅरंटी),नुकसानभरपाई व्यवहार (इन्डेमिनीटी व्यवहार करणे. | | |
| | १५ | राज्य सरकार,नगरपालिका,सहकारी व इतर संस्था,कार्पोरेशन्स,संघटना,यांचे शेअर्स कर्जरोखे ,स्टॉक्स संबंधीचे विमा,हमी,व्यवस्थापन सहभागी आदी बाबतचे व्यवहार करणे. | | |
| | १६ | बँकेच्या हिताच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीने वास्तू संपादन करणे,बांधणे तिची देखभाल करणे अथवा तिचे रुपांतर /बदल करणे. | | |
| | १७ | बँकेच्या पुर्ण अथवा अंशतः घेण्यापोटी ताब्यात आलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे,विकणे व अथवा तिची अन्य तऱ्हेने विल्हेवाट लावणे. | | |
| | १८ | सहकारी खात्याचे व रिझर्व बँकेचे परवानगीने बँकेचे कार्यक्षेत्रात जनतेला बँकिंग सेवा उपलब्ध करुन देणाच्या दृष्टीने शाखा अगर उपकार्यालये उघडणे. | रिजर्व्ह बँकेच्या परवानगीने बँकेच्या कार्यक्षेत्रात बँकिंग सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शाखा,विस्तार कक्ष,अेटीएम सेवा सुरु करणे. | उपकार्यालय शब्द वगळणे व अेटीएम सेवेचा समावेश करण्यासाठी |
| | १९ | सहकारी खात्याचे परवानगीने एखाद्या सहकारी संस्थेचा कारभार पूर्णपणे अगर अंशतः ताब्यात अगर व्यवस्थापनास घेणे. | | |
| | २० | सभासदांच्या ,बँकेच्या आजी व माजी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पूरक अशा संघटना,संस्था निधी,विश्वस्त निधी स्थापन करणे,स्थापनेस मदत करणे अथवा त्यात सहभागी होणे,तसेच बँकेचे कर्मचारी व माजी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या किंवा संबंधीत व्यक्तीस निवृत्ती वेतन (पेन्शन)मंजूर करणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २१ | सभासदांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी योजना करुन कर्ज पुरवठा करणे. | | |
| | २२ | लघु व कुटीर उद्योगधंद्यांना अर्थ पुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे व स्वयंरोजगारी उद्योजकास स्वतःचा उद्योगधंदा उभा करण्यास मदत करणे. | | |
| | २३ | जेथे आवश्यक असेल तेथे रिझर्व बँकेच्या परवानगीने इतर बँका अथवा संस्था यांच्या "सहभाग योजनेत" भाग घेऊन गरजूंना कर्ज पुरवठा करणे. | इतर संस्था किंवा बँका यांच्या सहभाग योजनेत भाग घेऊन गरजूंना कर्ज पुरवठा करणे. | रिझर्व्ह बँकेच्या परवानगीची आवश्यकता नाही. |
| | २४ | बँकींग रेग्युलेशन ॲक्ट(सहकारी बँकास लागू केलेले)१९४९चे कलम ६(१) अन्वये इतर व्यवहार करणे. | | |
| | २५ | विविध शासकीय संस्था,अर्धशासकीय संस्था व कायद्याच्या तरतुदीने अस्तित्वात येणाऱ्या संस्था इत्यादीसाठी अधिकृत प्रतिनिधी संस्था म्हणून निधी जमा करण्याचे काम करणे. | | |
| | २६ | मा.निबंधक यांचे पूर्व संमतीने व रिझर्व बँकेच्या परवानगीने महाराष्ट्र को-ऑप.हौसिंग फायनान्स सोसायटी,आयुर्विमा मंडळ निमसरकारी व इतर आर्थिक संस्था यांचेकडून पुनर्वित प्राप्त होईतो तात्पुरत्या स्वरुपाच्या अथवा कायम स्वरुपाच्या कर्जाचा पुरवठा सहकारी गृहनिर्माण संस्थांना करणे. | | |
| | २७ | केंद्र सरकारने सुचविल्यानुसार इतर कोणताही धंदा जो सहकारी बँका कायदेशीरपणे करु शकतात तो करणे. | | |
| | २८ | बँकेचे उद्देशाने अनुसरुन व तिचे वाढीस उत्तेजक असेल तो धंदा करणे. | बँकेच्या उद्देशास अनुसरुन व तिचे वाढीस उत्तेजक असेल तो धंदा किंवा व्यवसाय करणे. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |
| | २९ | सर्व नागरी सहकारी बँकांना इन्शुरन्स व्यवसायासाठी रेफरल बेसिसवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने परवानगी दिली आहे. त्यानुसार इन्शुरन्सचा व्यवसाय सुरु करणे,(मंजूर आदेश दि.२७/१२/२००६) | | |
| ६ | <br><br>अ<br>ब | **निधी**<br>खालील साधनांनी निधी उभारता येतील.<br>भागांची विक्री<br>प्रवेश फी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क<br>ड<br>ई<br>फ | वर्गणी<br>ठेवी<br>कर्जे,कॅशक्रेडीट,ओव्हरड्राप्ट व उचल<br>देणग्या,अनुदान व मदत | | |
| ७ | | **कर्ज उभारण्याची घेण्याची मर्यादा :-**<br>बँकेची बाहेरील कर्ज घेण्याची उसनवारीची मर्यादा महाराष्ट्र राज्य सहकार कायदा नियम क्र.३५ अथवा वीस पट यापैकी जी जास्त असेल त्यानुसार राहील,(वा.सा.सभा.दि.१४/०८/२००३)(मंजूर आदेश दि.१२/०९/२००३) | | |
| ८ | | **भागभांडवलः-**<br>बँकेचे अधिकृत भागभांडवल रु.पाट कोटी(रु.५००,००,०००/-)असून प्रत्येक भागाची दर्शनी किमंत रु.१००/- राहील,भाग भांडवल ५,००,०००/- भागात विभागलेले आहेत.(मंजूर दि.०८/११/२०१०) | बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु.७.०० कोटी असेल व ते पुढील प्रमाणे राहील.<br>अ)इक्विटी (जोखीम) भाग भांडवल ५००००० भाग प्रत्येकी रु.१००/- प्रमाणे = रु.५००००००००/-<br>ब)प्रेफरन्स शेअर कॅपीटल २०००० प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे = रु.२०००००००/-<br>एकुण = रु.७००००००००/-<br>प्रेफरन्स शेअर्सबाबत नियम करण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास राहील. | अधिकृत भागभांडवलाची फेररचना करुन वाढ करणेसाठी |
| ९ | अ | **सभासदत्व :-**<br>सज्ञान असलेली व करार करण्यास पात्र असलेली ,बँकेच्या कार्यक्षेत्रात राहणारी व बँकेच्या कार्यक्षेत्रात धंदा व्यापर उत्पादन करणाऱ्या व्यक्तीस सभासद होता येईल. | | |
| | ब | "अ "मध्ये उदघृत केल्या व्यतिरिक्त पोटनियम क्र.४(९)मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीची नोंदलेली कचेरी बँकेच्या कार्यक्षेत्रात अगर त्याचा धंदा कामकाज बँकेच्या कार्यक्षेत्रात असला पाहिजे,असे सभासदत्व खालील अटीवर दिले जाईल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १<br>२<br>३<br>४ | अशी व्यक्ती अगर अशा व्यक्तीच्या भागीदारी संस्थेतील भागीदारास फौजदारी व नेतिकतेच्या संबंधी गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेली नसावी,मात्र त्यास शिक्षा झाल्यापासून सहा वर्षे पेक्षा कमी कालावधी झालेला नसावा.<br>अशा व्यक्ती अगर संस्थांचा धंदा,उद्योग हा बँकेच्या धंद्याशी समांतर अगर संघर्ष निर्माण करणारा नसावा.<br>ती व्यक्ती बँकेची नोकर नसावी.<br>अशा व्यक्तीने सभासदत्वासाठी कमीत कमी एका भागाची पुर्ण रक्कम भरेलली असली पाहीजे.तसेच अशा व्यक्तीचा (सभासदत्वाचा)अर्ज संचालक मंडऴाने संमत केलेला पाहिजे. | अशा व्यक्तिने सभासदत्वासाठी कमीत कमी ५० भागांची पूर्ण रक्कम भरलेली असली पाहीजे.तसेच अशा व्यक्तिचा सभासदत्वाचा अर्ज संचालक मंडऴाने संमत केलेला पाहीजे. | भांडवल वृध्दीच्या हेतूने |
| | क | महाराष्ट्र शासन | | |
| | ड | पोटनियम क्रमांक ४(९)मध्ये काहीही तरतूद असली तरी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,मुंबई व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,अहमदनगर यांचे व्यतिरिक्त कोणत्याही सहकारी सोसायटीस सभासद्त्व दिले जाणार नाही.कायदा,नियम व पोटनियम यांचे तरतुदीनुसार सभासदत्वाचे प्राप्त होणारे अधिकार नियमानुसार सभासदत्वासाठी लागणारी र्‌क्कम भरल्याशिवाय किंवा त्याला बँकेत असे हितसंबंध प्राप्त झाल्याशिवाय त्या व्यक्तीस वापरता येणार नाहीत. | | |
| | इ | | क्रियाशील सभासद म्हणजे जो /जी सभासद व्यक्ती मागील सलग पाच वर्षापैकी किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थित असेल आणि तिचा संस्थेने उपविधीमध्ये ठरविलेल्या निकषानुसार संस्थेच्या व्यवसायामध्ये थेट सहभाग असल अशी व्यक्ती अशा सभासदास संस्थेच्या संचालक मंडऴाच्या निवडणूकीमध्ये मतदान करता येईल. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | | **नाममात्र सभासद :-** | | |
| | १ | एखादी व्यक्ती अविभक्त कुटुंबाची सहभागीदार असेल अथवा कर्जदार सभासदांची जामीनदार म्हणून राहणार असेल ,अथवा एखाद्या व्यक्तीस तात्पुरती गरज भागविण्यासाठी सोने चांदीचे दागिन्यांचे तारणावर विमा पत्रावर,सरकारी ऋणपत्रे ्अगर विश्वस्त संस्थांचे ऋणपत्रांचे तारणावर कर्ज घ्यावयाचे असेल तर अशा व्यक्तीस रु.१० प्रेवश फी (विनापरतीची)घेऊन तेसच ठरविलेल्या नमुन्यात अर्ज घेऊन नाममात्र सभासद म्हणून नोंदवावे. मात्र त्यांचेकडून त्यांनी घेतलेल्या जबाबदारीतून कर्ज अथवा जामीनदार या नात्याने मुक्त होताच सभासदत्व रद्द होईल हे मान्य असल्याचे कबुलीपत्र घेतेल पाहीजे,तसेच अशी व्यक्ती बँकेच्या कार्यक्षेत्रात राहणारी अगर व्यावसायिक उत्पन्न असणारी असावी.(मंजूर दि.१२/०९/२००६) | एखादी व्यक्ती अविभक्त कुटुंबाची सहभागीदार असेल अथवा कर्जदार सभासदांची जामीनदार म्हणून राहणार असेल ,अथवा एखाद्या व्यक्तीस तात्पुरती गरज भागविण्यासाठी सोने चांदीचे दागिन्यांचे तारणावर विमा पत्रावर,सरकारी ऋणपत्रे ्अगर विश्वस्त संस्थांचे ऋणपत्रांचे तारणावर कर्ज घ्यावयाचे असेल तर अशा व्यक्तीस रु.५० किंवा संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल त्यानुसार प्रवेश फी घेऊन तसेच ठरविलेल्या नमुन्यात अर्ज घेऊन नाममात्र सभासद म्हणून नोंदवावे. मात्र त्यांचेकडून त्यांनी घेतलेल्या जबाबदारीतून कर्ज अथवा जामीनदार या नात्याने मुक्त होताच सभासदत्व रद्द होईल हे मान्य असल्याचे कबुलीपत्र घेतेल पाहीजे,तसेच अशी व्यक्ती बँकेच्या कार्यक्षेत्रात राहणारी अगर व्यावसायिक उत्पन्न असणारी असावी.(मंजूर दि.१२/०९/२००६) | काळानुसार बदल आवश्यक |
| | २ | बँकेतील कर्मचाऱ्यांही नाममात्र सभासद होता येईल. व त्यास वरीलप्रमाणे (इतर नाममात्र सभासदाप्रमाणे) फायदे मिळतील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३ | सहकारी सोसायटीचे कायद्यानुसार नोंदणी झालेल्या सहकारी सोसायटीस नाममात्र सभासदत्व दिले जाणार नाही. | | |
| | ४ | नामात्र सभासदास शेअर सर्टिफिकेटस,डिव्हिडंड,बँकेची आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल मिळणे अथवा बँकेचे वार्षिक सर्वसाधारण सभेस अगर विशेष साधारण सभेस उपस्थित राहणे,भाग घेणे व मतदान करणे हे अधिकार राहणार नाहीत. | | |
| ११ | | वगळले | | |
| १२ | | **भाग दाखला :-**<br>प्रत्येक व्यक्ती सभासद म्हणून स्वीकृत झाल्यांवर त्या व्यक्तीने घेतलेल्या भागा बद्दल भाग दाखला (विनाशुल्क)घेण्यास पात्र होईल. भाग दाखल्यावर घेतलेल्या भागांचा उल्लेख असेल व त्यांचे अनुक्रमांक असतील,भाग दाखल्यावर बँकेचे अध्यक्ष,अथवा अधिकार दिलेले संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असतील,तसेच बँकेची मोहर (सील)त्यावर असेल. | | |
| १३ | | **भाग हस्तांतर करण्याबाबतः-** | | |
| | १ | एखाद्या सभासदास आपला एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाच्या नावाने वर्ग करता येईल,मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय व्यवहार पुर्ण झाला असे म्हणता येणार नाही.तेसच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ‘‘वर्ग फी’’ म्हणून रु.१(एक)भरली पाहीजे. | एखाद्या सभासदास आपला एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाच्या नावाने वर्ग करता येईल,मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय व्यवहार पुर्ण झाला असे म्हणता येणार नाही.तेसच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ‘‘वर्ग फी’’ म्हणून रु.५०/-(रु.पन्नास)भरली पाहीजे. | काळानुरुप बदल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २<br>अ | भाग वर्ग करण्याचे खालील कारणासाठी नाकरले जाईल<br>जर सभासदावर कर्जाचा बोजा अगर जामीनकीची जबाबदारी असेल तर, | | |
| | ब<br><br>३ | जर ज्या व्यक्तीचे नावावर भाग वर्ग करावयाचे असेल ती व्यक्ती पोटनियम क्रमांक ९ मधील तरतुदी पुऱ्या करीत नसेल तर.<br>जर एखादा भाग,दाखला खराब झाला,नष्ट झाला अगर हरवला त्याऐवजी नवीन भाग दाखला संचालक मंडळ ठरवील ती फी घेऊन देता येईल. मात्र त्यासाठी योग्य व समाधानकारक पुरावा संचालक मंडळास सादर करावा लागेल,असा पुरावा नसेल तर त्याविषयी संचालक मंडळ ठरविल त्याप्रकारचा (इंडेम्नीटी बॉण्ड) नुकसानभरपाईचा करार करुन द्यावा लागले. | | |
| १४ | <br>१<br><br><br><br><br><br><br><br><br><br>२<br>अ<br><br>ब<br><br>क | **सभासदत्वाचा राजीनामा देणे,संपुष्ट करणे व रद्द करणे.**<br>सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन स्वतःचे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेऊ शकेल.मात्र तसे करण्यापुर्वी त्यांचेकडे येणे असलेल्या रकमांची पूर्ण फेड झाली असली पाहीजे व जामीनदार म्हणून जबाबदारी पूर्ण झालेली असावी. तसेच सभासदत्व कमी करतांना सभासद होऊन पाच वर्षापेक्षा कमी काळ झालेला नसावा.कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यात आलेले भांडवल त्या वर्षापुर्वीचे ३१ मार्च रोजी असलेल्या वसूल झालेल्या भाडंवलाचे १० ट्क्केपेक्षा जास्त रकमेचे असणार नाही. अशा परत केलेल्या भांडवलामुळे वसूल झालेल्या भांडवलाची व निधीची खरी किंमत बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट कलम ११(१)नुसार निर्देशित केलेल्या किमंतीपेक्षा कमी होणार नाही हे पाहीले पाहीजे. (वा.सा.सभा.ता.०४/११/९३)(मंजूर आदेश दि.१२/०१/९४)<br><br>सभासद्त्व खालील कारणाने संपुष्टात येईल.<br>मरणाने अगर भागीदारी फर्मच्या भागीदारी रद्द होण्याने अगर संस्थेने दिवाळे काढल्यास.<br><br>नादारी जाहीर झाल्याने अगर कायदेशीर तरतुदीने सभासद राहण्यास लायक न ठरल्यास.<br>पोटनियम क्रमांक ९च्या तरतुदीचा भंग झाल्यास | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ड | सर्व भाग हस्तांतर केल्यास | | |
| | ई<br>फ<br><br>ग<br><br>ह<br><br>३ | राजीनामा दिल्याने अगर सभासदत्व कमी करण्याची मागणी मान्य झाल्यास<br>कायद्यातील व नियमातील तरतुदीनुसार काढून टाकल्यास,अशा काढून टाकल्याने भागाची रक्कम जप्त करण्यात येईल.<br><br><br><br>सभासदत्व कायदा व नियमानुसार रद्द करता येईल.सभासदत्व रद्द झाल्यानंतर सभासदाने धारण केलेले भाग जप्त करण्यास पात्र होतील. | जो सभासद गेल्या पाच वर्षातील एकाही वार्षिक सर्व साधारण सभेस हजर नसेल.तसेच बँक देत असलेल्या किमान सेवा -सुविधा उपविधी क(इ) नुसार घेत नसल्यास त्यास अ क्रियाशील सभासद संबोधण्यात येईल.व त्यास आर्थिक वर्ष संपल्या पासून ३० दिवसात कळविण्यात येईल.अथवा बँकेच्या नोटीस बोर्डवर अशा सभासदांची यादी लावण्यात येईल.अशा अ -क्रियाशील सभासदाने पुढील ५ वर्षात एकही वार्षिक सभेस हजर न राहील्यास सेक्शन ३५ नुसार सभासदत्व रद्द होईल.<br><br>कर्ज परतफेड करतांना कर्जरकमेत सूट घेतली असल्यास सभासदत्व रद्द करण्यात येईल. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| | ४ | | अ-क्रियाशील सभासद म्हणून जाहीर झाल्यास त्यास त्यापुढील पाच वर्षात एक सभा उपस्थित राहून व किमान सेवा -सुविधा घेऊन क्रियाशील होता येईल. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | | **वारस नेमणेबाबतः-**<br>सभासदास आपले पश्चात बँकेतील आर्थिक/सांपत्तीक हक्क -जबाबदारी घेण्यासाठी वारसाची नेमणूक करता येईल.वारस नेमणेबाबत विहित नमुन्यामध्ये अर्ज केला पाहीजे व त्याची नोंद बँकेचे नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिष्टर मध्ये झाली पाहीजे.जर वारस बँकेचा सेवक असेल तर संचालक मंडळाची पूर्व परवानगी घेतली पाहीजे.कोणत्याही वेळी अगोदर नोंदलेले वारसपत्र मागे घेऊन नवीन वारसपत्र दाखल करता येईल.मात्र त्यासंबंधीची लेखी माहिती बँकेस दिली पाहीजे.तसेच नवीन वारस पत्र दाखल करतांना प्रत्येकवेळी एक रुपया फी द्यावी लागेल. | सभासदास आपले पश्चात बँकेतील आर्थिक/सांपत्तीक हक्क -जबाबदारी घेण्यासाठी वारसाची नेमणूक करता येईल.वारस नेमणेबाबत विहित नमुन्यामध्ये अर्ज केला पाहीजे व त्याची नोंद बँकेचे नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिष्टर मध्ये झाली पाहीजे.जर वारस बँकेचा सेवक असेल तर संचालक मंडळाची पूर्व परवानगी घेतली पाहीजे.कोणत्याही वेळी अगोदर नोंदलेले वारसपत्र मागे घेऊन नवीन वारसपत्र दाखल करता येईल.मात्र त्यासंबंधीची लेखी माहिती बँकेस दिली पाहीजे.तसेच नवीन वारस पत्र दाखल करतांना प्रत्येकवेळी पन्नास रुपये फी द्यावी लागेल. | |
| १६ | | **सभासदाचा मुत्यूः-**<br>सभासदाचे मुत्यूनंतर बँकेतील त्या सभासदांच्या भागाची र्क्कम नेमलेल्या वारस /वारसास मुत्यूबाबत कळल्यापासून सहा महिन्याचे आत दिली पाहीजे.जर वारस नेमले नसेल तर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस आहे अथवा जो मृत्यू पावलेल्या सभासदाचा कायदेशीर प्रतिनिधी आहे.अशी खात्री असेल त्यास,बँक रक्कम देईल.मात्र आवश्यक तो नुकसान भरपाईचा करार घेऊन रक्कम दिली जाईल.अशा रकमेत भागभांडवल,लाभांश ,ठेवी व त्यावरील व्याज अथवा कोणत्याही प्रकारची मयत सभासदास देय असलेली रक्कम यांचा समावेश होईल.अशी र्क्कम देतांना बँकेची येणे असलेली र्क्कम वजा केली जाईल. | | |
| १७ | | **सभासदाची जबाबदारी :-** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सभासदाने घेतलेल्या भागांच्या रकमे इतकीच त्याची जबाबदारी राहील.माजी सभासदांची जबाबदारी ज्यावेळी त्याचे सभासद्तव रद्द /कमी झाले त्यावेळेपासून दोन वर्षापर्यंत राहील. तसेच मयत सभासदाचे मालमत्तेवर जबाबदारी पोटी दोन वर्ष पर्यंत बोजा राहील. | | |
| १८ | | **सभासदाचे भागभांडवल ,लाभांश व ठेवीवरील बँकेचा हक्क :-**<br>सभासदाचे अगर माजी सभासदाचे बँकेचे येणे असेल`तर त्यापोटी बँकेत सभासदांचे असलेल्या भागांवर,लाभांश व ठेवीवर बँकेचे प्रथम व सर्वश्रेष्ठ हक्क व बोजा राहील. बँक केव्हाही त्यांच्या जबाबदारीपोटी त्याला देय असलेली र्क्कम वळती करुन घेईल. | | |
| १९ | | **सर्वसाधारण सभा :-** | | |
| | १ | कायदा व नियम याचे आधीन राहून बँकेचे व्यवहाराबाबतचे सर्व अंतीम अधिकार साधारण सभेकडे राहतील. | | |
| | २ | साधारण सभा दोन प्रकारच्या असतील(१)वार्षिक सर्वसाधारण सभा व (२)विशेष साधारण सभा. | | |
| | ३ | वार्षिक साधारण सभा दरवर्षी १४ ऑगस्ट पूर्वी अगर सहकारी खात्याचे अनुमतीने वाढविलेल्या मुदतीपुर्वी होईल. (वा.सा.सभा दि.०४/११/९३)(मंजूर आदेश दि.१२/०१/९४) | वार्षिक सर्वसाधरण सभा आर्थिक वर्ष पुर्ण झाल्यापासून ६ महिन्याच्या आत अगर सहकारी खात्याच्या अनुमतीने वाढविलेल्या मुदतीपुर्वी होईल. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| | ४ | विशेष साधारण सभा अध्यक्ष अगर संचालक मंडळाचे मतधिक्याने संचालक मंडळास केव्हाही बोलविता येईल.तसेच अशी सभा निबंधक सहकारी संस्था यास अगर सभासदांपैकी एक पंचमांश अगर एकुण १०० सभासद यापैकी जी संख्या कमी असेल अशांनी मागणी केल्यास बोलविता येईल. | विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्ष अगर संचालक मंडळाचे माताधिक्याने संचालक मंडळास केव्हाही बोलविता येईल.तसेच अशी सभा निबंधक सहकारी संस्था यास अगर सभासदांपैकी १/५ अगर क्रियाशील सभासदासह २०० सभासद यापैकी जी संख्या कमी असेल आशांनी मागणी केल्यास बोलविता येईल. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |
| २० | | **वार्षिक सर्वसाधारण सभेची कामे :-**<br>वार्षिक सर्वसाधारण सभेची कामे खालीलप्रमाणे असतील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १<br>२<br>३<br>४<br>५<br>६<br>७<br>८<br>९ | मागील सर्वसाधारण सभा /सभांची इतिवृत्त वाचून कायम करणे. (वा.सा.सभा.दि.११/०२/९१)(मंजूर आदेश दि.१५/०३/९१)<br>संचालक मंडळाच्या बँकेच्या कार्याबद्दलचा साल अखेरचा अहवाल,ताळेबंद व नफातोटा पत्रके लेखा परिक्षकांचे अहवालासह विचार करणे.<br>नफा वाटणी मंजूर करणे व लाभांश जाहीर करणे.<br>वार्षिक लेखा परिक्षकांबाबत मे.निंबधक सहकारी संस्था व लेखा परिक्षक यांचेकडून आलेल्या पत्रव्यवहारांचा विचार करणे.<br>अंतर्गत तपासणीसाठी योग्य त्या पात्रतेच्या लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.<br>वगळणे.(मंजूर दि.२४/०९/२००१)<br>संचालक मडळास बँकेचे व्यवहाराबाबत जास्तीत जास्त किती मर्यादेपर्यंत रकमा उभ्या करता येतील यासंबंधी निश्चिती करणे.<br>सभेपुढे अध्यक्षांच्या परवानगीने योग्यवेळी योग्य ती सूचना देवून मांडलेल्या / विचारार्थ ठेवलेल्या विषयांचा विचार करणे,मात्र असे विषय पोटनियम सुधारणा व सभासद काढून टाकणे या व्यतिरिक्त असले पाहीजेत. तसेच एखाद्या विषयाचा सहा महिनेचे आत पुनर्विचार करण्यासंबंधीचा विषय नसावा.<br>सभेस हजर असणाऱ्या दोन तृतियांश सभासदांच्या परवानगीने कोणाही सभासदास सभेच्या विषय पत्रिकेत नमूद न केलेला विषय मांडता येईल.मात्र पोटनियम सुधारणा,सभासद अथवा संचालक मंडळाचा सदस्य काढून टाकणे व एखाद्या विषयाचा सहा महीनेचे आत पुनर्विचार करण्यासंबंधीचा हा विषय नसावा. | | |
| २१ | | **विशेष सर्वसाधारण सभेपुढील कामकाज :-**<br>विशेष सर्वसाधारण सभेच्या सुचनापत्रात (नोटीसीत)अंतर्भूत असलेल्या विषयापुरतेच विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज मर्यादित राहील. | | |
| २२ | | **सुचना (नोटीस)-वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभाः-** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १ | वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना(नोटीस)सभासदाच्या नोंदलेल्या पत्त्यावर संचालक मंडळाचा अहवाल ,लेखा परिक्षकांनी तपासलेली ताळेबंद व नफातोटा पत्रके व विषय पत्रिकेसह सभेच्या तारखेच्या १४ दिवस अगोदर पाठविली पाहीजे. | वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (नोटीस) सभासदाच्या नोंदलेल्या पत्त्यावर अथवा e-mail ID वर सभेच्या १४ दिवस अगोदर पाठविण्यात येईल. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २ | पोटनियम क्रमांक १९(४)नुसार विशेष सर्वसाधारण सभा सभासदांच्या मागणीनुसार अगर निबंधक यांनी केलेल्या मागणीचे तारखेपासून एक महिन्याचे आत बोलविली पाहीजे. विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनापत्रात (नोटीसीत)मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करुनच सभा बोलविली पाहीजे. अशा सभेत विषय पत्रिकेवर फक्त मागणी केलेला विषयच राहील. सभासदाचे नोंदलेल्या पत्त्यावर अशा सभेचे सुचनापत्र(नोटीस)सभेच्या तारखेपूर्वी कमीत कमी सात दिवस अगोदर पाठविले पाहीजे. | पोटनियम क्रमांक १९(४)नुसार विशेष सर्वसाधारण सभा सभासदांच्या मागणीनुसार अगर निबंधक यांनी केलेल्या मागणीचे तारखेपासून एक महिन्याचे आत बोलविली पाहीजे. विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनापत्रात (नोटीसीत)मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करुनच सभा बोलविली पाहीजे. अशा सभेत विषय पत्रिकेवर फक्त मागणी केलेला विषयच राहील. सभासदाचे नोंदलेल्या पत्त्यावर अथवा email ID वर अशा सभेचे सुचनापत्र(नोटीस)सभेच्या तारखेपूर्वी कमीत कमी सात दिवस अगोदर पाठविले पाहीजे. | |
| | ३ | कोणत्याही सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र(नोटीस)मिळाले नाही हे सभा तहकुब करण्यासाठी अथवा पुढे ढकलण्यासाठी पुरेसे कारण ठरणार नाही. | | |
| | ४ | कोणत्याही सर्वसाधारण सभेच्या सुचनापत्रात (नोटीसीत)सभेची जागा,तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. तसेच सदरहू सूचनापत्रात (नोटीसीत)गणपूर्ती(कोरम)अभावी तहकूब झालेल्या सभेची जागा ,तारीख व वेळेचा उल्लेख असला पाहिजे. | | |
| | ५ | मा.चेअरमन यांचे सूचनेवरुन सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र (नोटीस)मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने दिले जाईल. | | |
| | ६ | | वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच विशेष सर्वसाधारण सभा संदर्भात सभासदांना द्यावयाची नोटीस बँकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या असलेल्या कोणत्याही वर्तमान पत्रातून प्रसिध्द केल्यास तसेच सर्व शाखांमधून नोटीस बोर्डवर लावल्यास त्या नोटीसीची बजावणी पूर्ण झाल्याचे समजण्यात येईल. | शाखा विस्तार होत असल्याने सोईसाठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | | **वार्षिक सर्वसाधारण सभा व सभासदांनी मागणी केलेली विशेष सर्वसाधारण सभेची गणपूर्ती (कोरम)ः-**<br>कोणत्याही सर्वसाधारण सभेस एकुण सभासद संख्येच्या एक पंचमांश अगर ३० यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती(कोरम ) झाली असे समजण्यात येईल.सभासदांनी मागणी केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी मात्र ज्या सभासदांनी मागणीवर स्वाक्षरी केल्या असतील त्या सभासदांपैकी निम्मेपेक्षा जास्त सभासद हजर असल्याशिवाय गणपूर्ती (कोरम)झाली असे समजण्यात येणार नाही. | | |
| २४ | <br>१<br><br><br><br><br><br>२ | **वार्षिक सर्वसाधारण सभेची तहकूबी आणि विशेष सर्वसाधारण सभा रद्द होणे बाबत**<br>जर वार्षिक सर्वसाधारण सभा गणपूर्ती (कोरम) अभावी होऊ शकली नाही तर सुचनापत्रात (नोटीसीत)नोंद केले प्रमाणे अर्ध्या तासासाठी अगर सात दिवसांसाठी तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा नंतर भरल्यावर सभेच्या मुळ विषय पत्रिकेमध्ये समाविष्ट केलेल्या विषयावर गणपूर्ती (कोरम) असो अगर नसो विचार केला जाईल.<br><br>सभासदांच्या लेखी मागणीवरुन बोलविण्यात आलेली विशेष साधारण सभा सभेच्या नियोजित वेळेपासून एक तासाने गणपूर्ती (कोरम)होऊ शकली नाही तर सभा रद्द होईल. | | |
| | ३ | | वेळेअभावी एखाद्या सर्वसाधारण सभेची सूचना पत्रकामध्ये नमूद केलेले कामकाज अपुर्ण राहिल्यास पुढील सभेची तारीख,वेळ व जागा सदरहू सभेस हजर असलेल्या सभासदाच्या बहुमताने ठरविण्यात येईल.मात्र अशी सभा मुळ सभेच्या तारखेपासून ३ दिवसांचे आत घेतली पाहीजे. तसेच सभेची लेखी सूचना सभासदास पाठविली जाणार नाही. | वेळप्रसंगी उपयुक्ततेसाठी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | | **सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष :-** | | |
| | १ | संचालक मंडळाचे अध्यभाचा कालावधी १ एप्रिल ते ३१ मार्च राहील व संचालक मंडळाचे अध्यक्षाची निवड ही मार्च महिन्यात केली जाईल. | वगळणे. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| | २ | ज्या वर्षी पंचवार्षिक निवडणूक होईल त्यावर्षी निवडणूकीनंतर होणाऱ्या पहिल्या अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा कालावधी हा त्यांच्या निवडीपासून येणाऱ्या ३१ मार्चपर्यंत राहील. | वगळणे. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| | ३ | ज्या आर्थिक वर्षाचे संबंधाने वार्षिक सर्वसाधारण सभा असेल अशा सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान त्या आर्थिक वर्षातील अखरेचे दिवशी अध्यक्ष असणाऱ्या व्यक्तीकडे राहील. संबंधीत काळातील अध्यक्ष सभेस गैरहजर असल्यास त्या काळातील उपाध्यक्ष अध्यक्षपद भुषवतील. | सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद ज्या आर्थिक वर्षासाठीची सभा असलेल्या कालावधीसाठीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष यांचेकडे राहील. त्याच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष व दोघांच्या गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद एकाची निवड सभेचे अध्यक्षपदासाठी करतील. | योग्य रित्या खुलासा होणेसाठी |
| | ४ | अशा वार्षिक सर्वसाधारण सभेस आर्थिक वर्षात असलेले अध्यक्ष /उपाध्यक्ष गैरहजर असल्यास विद्यमान अध्यक्ष अध्यक्षपद भुषवतील. | | |
| | ५ | विशेष साधारण सभेचे अध्यक्ष पद त्यावेळचे विद्यमान अध्यक्ष भुषवतील.त्यांचे गैरहजेरीत विद्यामान उपाध्यक्ष आणि दोघांचे गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभचे अध्यक्षपदासाठी करतील. (मंजूर आदेश दि. २७/१२/२००६) | | |
| २६ | | **मतदानाचा अधिकार** | | |
| | १ | प्रत्येक सभासदास,त्याने कितीही भाग धारण केलेले असले तरी एक मत राहील. | | |
| | २ | व्यक्तीगत सभासद स्वतः मतदान करतील तर भागीदारी संस्था,कंपनी,राज्य शासन इत्यादी सभासद त्यांचे मतदान अनुक्रमे भागीदार,संचालक,अधिकारी यांना असा अधिकार देवून करतील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३ | निवडणूकी व्यतिरिक्त समसमान मताचे प्रसंगी ,सभेचे अध्यक्षास सभासद म्हणून असलेल्या माताशिवाय एक निर्णायक मत (कास्टींग व्होट )राहील. | | |
| | ४ | कोणाही सभासदास त्याची सभासदत्वाची नोंदणी झाल्यापासून १२ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्याशिवाय संचालक मंडळाच्या निवडणूकीस मतदान करण्यास पात्र समजले जाणार नाही. | | |
| | ५ | | जो सभासद गेल्या पाच वार्षिक सर्वसाधारण सभेपैकी एकाही सभेस हजर नसेल,ज्याने बँकेच्या किमान सेवा सुविधांचा गेल्या २ वर्षात उपभोग घेतला नसेल तो सभासद अ -क्रियाशील समजला जाऊन त्यास मतदानाचा हक्क राहणार नाही. क्रियाशील सभासद राहण्यासाठी किमान सेवा सुविधा खालील प्रमाणे मतदार यादी तयार करणेच्या तारखेस ज्या बँकेचे डिपॉझीट रु.१०० कोटी ते रु.५००/- कोटी आहे.त्या बँकेच्या सभासदाचे किमान शेअर्स रक्कम रु.२०००/- असावी.आणि बँकेत एकुण डिपॉझीट रक्कम रु.२०,०००/- किंवा कर्ज रक्कम रु.५००००/-असणे आवश्यक आहे. | ९७ वी घटनादुरुस्तीनुसार |
| | ६ | | तसेच मतदार यादी प्रसिध्द करतेवेळी सभासदाचे कर्ज थकबाकीत असल्यास त्यास निवडणूकीत मतदान करता येणार नाही. | |
| २७ | | **ठराव** | | |
| | १ | ज्याबाबत विशिष्ट तरतुदी,कायदा,नियम व पोटनियम असतील असे विषय वगळता इतर बाबतीत ठराव मंजूर करताना हातवर करुन मतधिक्य अजमावले जाईल.मात्र जर २५ सभासदांनी गुप्त मतदानाची मागणी केली तर त्याप्रमाणे त्वरीत मतदान घेण्यात येईल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २ | मे.निबंधक ,सहकारी संस्था यांनी खास सूचना केल्याशिवाय सर्वसाधारण सभेत पुढील आशयाचे ठराव मांडता येणार नाहीत. | | |
| | अ<br>ब | पदाधिकाऱ्यांचे निवडणूकीबाबत व<br>पूर्वीचे साधारण सभेत मंजूर झालेला ठराव पुनर्विचारासाठी चर्चेला मांडावयाचा झाल्यास मात्र सदर ठराव मंजूर होऊन सहा महिने पूर्ण झालेले असले पाहिजे. | | |
| २८ | | **इतिवृत्त**<br>सर्वसाधारण सभचे इतिवृत्त त्यासाठी असलेल्या इतिवृत रजिस्टरमध्ये नोंदवून सर्व साधारण सभा झाल्यानंतर तीन महिन्याचे आत त्यावर अध्यक्षाने सही केली पाहीजे आणि असे इतिवृत्त पुढील जनरल मिटींग मध्ये वाचून कायम करण्यात येईल.(वा.सा.सभा दि.११/०२/९१)(मंजूर आदेश दि.१५/०३/९१) | | |
| २९<br><br>१ | | **संचालक मंडळ**<br>संचालक मंडळाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.<br><br>बँकेचे सभासदातून सभासदांनी निवडलेले ११ संचालक असतील. | **संचालक मंडळ**<br>संचालक मंडळाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.<br>बँकेचे सभासदांमधून सभासदांनी निवडलेले १२ संचालक असतील. | ९७ वी घटनादुरुस्तीनुसार |
| २ | | राज्य शासनाने बँकेचे भाग भांडवल घेतले असल्यास ,बँकेचे संचालक मंडळावर एक संचालक राज्यशासन नियुक्त करेल. | | |
| ३ | अ | या पोटनियमातील उपकलम १ व २ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त संचालक मंडळावर खालीलप्रमाणे ६जागा राखीव राहतील.<br><br>१ जागा - मागासवर्गीय जाती,अनुसुचित जमातीसाठी<br>१ जागा - इतर मागासवर्गीय जाती (O.B.C.)साठी | या पोटनियमातील उपकलम १ व २ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त संचालक मंडळावर खालीलप्रमाणे ५ जागा राखीव राहतील.<br><br>१ जागा - मागास वर्गीयसाठी ,अनुसूचित जमातीसाठी<br>१ जागा - ओ.बी.सी.साठी | |
| | | १ जागा - डीनोटीफाईड अनुसूचित जमाती (विमुक्त जाती)भटक्या जमाती व विशेष मागासवर्गीयांसाठी<br>१ जागा - दुर्बल घटकांसाठी<br>२ जागा - महिलांसाठी | १ जागा - डीनोटीफाईड अनुसूचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमातीसाठी<br>२ जागा - महिलांसाठी | ९७ वी घटनादुरुस्तीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अअ | ३ अ मध्ये नमूद केलेल्या घटक /जाती/जमातीतील कोणत्याही सभासदास राखीव जागेसाठी निवडणूक लढविण्याचा हक्क राहील. संचालक मंडळाचे निवडणूकीत मतदान करण्याचा हक्क असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस राखीव जागेच्या निवडणूकीत मतदान करता येईल. | | |
| | अअअ | वरील सहा राखीव जागेसाठी कोणीही व्यक्ती निवडणूकीत उभी न राहिल्यास निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या संचालक मंडळाचे सभेच्या तारखेनंतर १५ दिवसांचे आत ,संचालक मंडळ उपकलम ३(अअ) अन्वये निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभासदामधून ह्या जागा स्विकृती करुन भरेल. | वरील पाच राखीव जागेसाठी कोणीही व्यक्ति निवडणूकीत उभी न राहील्यास निवडणूकी नंतर होणाऱ्या पहिल्या संचालक मंडळाच्या सभेच्या तारखेनंतर १५ दिवसांचे आत,संचालक मंडळ उपकलम ३(अअ) अन्वये निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभालदांमधून ह्या जागा स्विकृत करुन भरेल. | |
| | अअअअ | संचालक मंडळाने वरील प्रमाणे संचालक स्विकृत केले नाहीत तर उपकलम (अअ)प्रमाणे राखीव जागांसाठी निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभासदामधून निबंधक अशा नेमणूका करील. | | |
| | | स्पष्टीकरण ः- ह्या पोटनियमा करिता ः- | | |
| | अ) | ''अनूसुचित जाती'' मध्ये नवबुध्दांचा समावेश असेल. | | |
| | ब) | ''दुर्बल घटकातील सभासद ''म्हणजे राज्यशासन सर्वसाधारण अथवा खास आदेश काढून ठरविल ते सभासद अथवा अशा सभासदांचा वर्ग. | वगळणे. | ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार |
| ४ | अ | बँकेच्या कायम कर्मचाऱ्यांची संख्या २५ किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | | |
| | १ | जर संचालक मंडळाच्या सदस्यांची संख्या ११ किंवा त्यापेक्षा कमी असल्यास १ जागा | | |
| | २ | जर संचालक मंडळाच्या सदस्यांची संख्या १२ किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास,११ सदस्यानंतरच्या प्रत्येक १० सदस्यानंतर एक कर्मचारी प्रतिनिधी नेमावा लागेल. मान्यताप्राप्त युनियन कर्मचाऱ्यांमधून कर्मचारी प्रतिनिधी निवडून देईल.अशी युनियन नसेल तर राज्यशासन अशा प्रतिनिधीची संचालक मंडळावर नियुक्ती करील. या कर्मचारी प्रतिनिधींना पदाधिकारी होता येणार नाही. अगर पदाधिकाऱ्यांचे निवडणूकीसाठी मतदान करता येणार नाही. | वगळणे. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब | निवडून आलेल्या व नेमणूक केलेल्या संचालकांव्यतिरिक्त संचालक मंडळ दोन तज्ञ व्यक्तिची १ वर्षासाठी संचालक म्हणून स्विकृत करु शकेल. हे तज्ञ संचालक बँकेच्या व्यवस्थापनावर मध्यम किंवा वरिष्ठ पदाचा अनूभव असलेले अधिकारी किंवा व्यावसयिक पात्रता असलेले चार्टर्ड अकौटंट की ज्यांना बँक अकौंटीगचा / ऑडिटींगचा अनुभव आहे असे असले पाहिजेत. मात्र अशा संचालक सदस्यांना संचालक मंडळाच्या सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही. सदरची स्विकृती वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर दरवर्षी करण्यात येईल. (वा.स.सभा ता. १३/८/२००२)(मंजूर आदेश दि.०६/०९/२००२) | निवडून आलेल्या व नेमणूक केलेल्या संचालकांव्यतिरिक्त संचालक मंडळ दोन तज्ञ व्यक्तिची १ वर्षासाठी संचालक म्हणून स्विकृत करु शकेल. हे तज्ञ संचालक बँकेच्या व्यवस्थापनावर मध्यम किंवा वरिष्ठ पदाचा किमान १० ते १५ वर्षाचा अनूभव असलेले अधिकारी किंवा व्यावसयिक पात्रता असलेले चार्टर्ड अकौटंट की ज्यांना बँक अकौंटीगचा / ऑडिटींगचा किमान १० ते १५ वर्षांचा अनुभव आहे असे असले पाहिजेत. त्याचप्रमाणे कमाल संचालक संख्या २१ असणार हे लक्षात घेऊन मा.संचालक मंडळ आवश्यकतेनुसार क्रियाशील सभासदांमधून सहकार क्षेत्राचा अनुभव व जेष्ठता पाहून संचालक म्हणून स्विकृत करु शकतील.मात्र वरील प्रकारच्या अशा संचालक सदस्यांना संचालक मंडळाच्या सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही. | अधिक स्पष्ट होणेकरीता |
| ५ | | मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा पदसिध्द (एक्स ऑफीशिओ) सभासद असेल ,मात्र त्यास संचालक मंडळाच्या सभेत पदाधिकाऱ्यांचे निवडणूकीसाठी मतदान करता येणार नाही. | मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा कार्यलक्षी संचालक (Functional Director)असेल मात्र त्यास संचालक मंडळाच्या सभेत पदाधिकाऱ्यांचे निवडणूकीसाठी मतदान करता येणार नाही. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |
| ६ | | पोटनियम क्रमांक ३६(२९)(ग) अन्वये संचालक मंडळाने तयार केलेल्या व सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या निवडणूक नियमास अनुसरुन सर्व संचालक सदस्यांची निवड दर पाच वर्षांनी होईल. | | |
| ७ | | संचालक मंडळाची मुदत पाच वर्षाची राहील.(वा.सा.सभा ता.०४/११/९३) (मंजूर आदेश ता.१४/०७/९५) | | |
| ३० | | **अध्यक्ष उपाध्यक्ष - संचालक मंडळाचे :-** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १) | दर वर्षाचे १५ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत नवीन आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी संचालक मंडळाचे सभेचे अध्येक्ष  व उपाध्यक्ष यांची एक वर्षासाठी निवड संचालक मंडळातून बहूमताने होईल.सदर सभा मे.निंबधक ,सहाकरी संस्था / अगर त्याचे प्रतिनिधी यांचे अध्यक्षतेखाली होईल. | संचालक मंडळाची निवडणूक झाल्यानंतर जी प्रथम सभा होईल त्यात संचालक मंडळाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड निवडून आलेल्या संचालकामधून होईल व त्यांचा कालावधी संपुर्ण पाच वर्ष म्हणजेच संचालक मंडळाच्या मुदती एवढा राहील. तो कालावधी निवडणूक प्राधीकरण किंवा त्यांनी पाधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होईल. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |
| | २) | ज्यावर्षी बँकेची पंचवार्षिक निवडणूक होईल त्यापुर्वी निवडणूकीनंतर होणाऱ्या पहिल्या अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा कालावधी हा त्यांच्या निवडीपासून येणाऱ्या ३१ मार्चपर्यंत राहील. | संचालक मंडळाचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यास,निवडणूक प्राधीकरण अधिकारी किंवा त्यांनी प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नविन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची बहुमताने निवड केली जाईल. | |
| | ३) | सभेचे अध्यक्षास स्वतःचे मता व्यतिरिक्त निर्णायक मत राहील. ह्या निर्णायक मताचा वापर अध्यक्ष व उपाध्यक्षाच्या निवडणूकीत करता येणार नाही,अशा वेळी निर्णय चिठ्ठी / चिठ्ठ्या टाकून घेण्यात येईल. | | |
| | ४) | पोटनियम क्रमांक ३०(१) च्या तरतुदीनुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची मुदत पोटनियम क्र.२५(१) नुसार एक वर्ष राहील व ते पुन्हा निवडणूकीस पात्र असतील.(मंजूर आदेश दिनांक २७/१२/२००६) | वगळणे. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | | **संचालक पदाच्या निवडणूकीच्या पात्रता :-**<br>संचालक पदासाठीचे निवडणूकीत भाग घेण्यासाठी ज्या वर्षात निवडणूक व्हावयाची असेल त्यापुर्वी संपणाऱ्या सहकारी वर्षात तो सभासद होऊन कमीत कमी दोन सलग वर्ष झाली असली पाहीजेत,तसेच कायदा,नियम व पोटनियमाचे तरतुदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र होता कामा नये. | **संचालक पदाच्या निवडणूकीच्या पात्रता :-**<br>संचालक पदाचे निवडणूकीत भाग घेण्यासाठी ज्या वर्षात निवडणूक व्हावयाची असेल त्यापुर्वी संपणाऱ्या वर्षात तो सभासद होऊन किमान दोन वर्ष झालेली असली पाहिजेत,तसेच निवडणूकीच्या आधीच्या पाच वर्षात असा सभासद थकबाकीदार नसला पाहिजे व कायदा,नियम,पोटनियम तरतूदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र असला पाहिजे तसेच बँकेचे त्याच्याकडे किमान रु.२००००/- चे शेअर्स व बँकेत किमान ठेव रु.१ ते २ लाख असली पाहीजे. | |
| ३२ | | **संचालक पद रिकामे होणे,संपणे:-**<br>संचालकाचे संचालक पद मुदतीपूर्वी संपले असे मानले जाईल जर :- | | |
| | १) | तो कर्जदार या नात्याने तीन महिन्याचे वर थकबाकीदार झाल्यास (वा.सा.सभा.१३/८/२००२)मंजूर आदेश दि.६/९/२००२) | | |
| | २) | त्याने राजीनामा दिला व स्विकारण्यात आला तर अथवा इतर कारणाने त्याचे सभासदत्व नष्ट झाले तर | | |
| | ३) | तो गैरहजेरी बद्दल रजा न घेता ओळीने तीन महिने संचालक मंडळाच्या सभेस गैरहजर राहिल्यास. | | |
| | ४) | तो नादार झाल्यास अथवा कायदेशीर अपात्रता आल्यास | | |
| | ५) | त्यास नैतिक स्वरुपाच्या फौजदारी गुन्ह्यासाठी शिक्षा झाल्यास मात्र त्यास शिक्षा झाल्यापासून सहा वर्षे झालेली नसावीत. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ६) | बँकेत फायद्याची जागा स्विकारल्यास,मात्र हे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळावरील कर्मचारी प्रतिनिधी यांना लागू होणार नाही. | बॅंकेत फायद्याची जागा स्विकारल्यास,मात्र हे मुख्य कार्यकारी अधिकारी की जे कार्यलक्षी संचालक आहेत यांना लागु होणार नाही. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |
| ३३ | | **संचालक मंडळावरील रिकामी जागा :-**<br>एखाद्या संचालकाचा राहिलेला कालावधी एका वर्षापेक्षा जास्त नसेल व त्याच्या मूत्युने ,काढून टाकल्याने,राजीनामा दिल्याने अथवा अन्य कारणाने त्याची जागा रिकामी झाल्यास ही जागा एखाद्या सभासदाची स्विकृती करुन भरता येईल.मात्र स्विकृती तारखेच्या अगोदर ३० जून रोजी असा सभासद सतत दोन वर्ष सभासद असला पाहीजे. अशा रितीने जास्तीत जास्त दोन जागा भरता येतील .एका वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी जागा रिकामी राहणार असेल तर निवडणूक घेऊनच ही जागा भरावी. | **संचालक मंडळावरील रिकामी जागा :-**<br>संचालक मंडळामध्ये कोणत्याही कारणाने रिक्त जागा निर्माण झाल्यास ,जागा रिक्त झाल्यापासून संचालक मंडळाचा उर्वरित कालावधी अडीच वर्षापेक्षा जास्त असेल तर ती जागा निवडणूकीनेच भरावी लागेल.अशा जागेकरीता निवडणूक जागा रिक्त झालेपासून ६ महिन्याच्या आत घ्यावी लागेल.ज्या प्रवर्गामध्ये रिक्तता झाली आहे त्या प्रवर्गातीलच जागा भरावी लागेल.रिक्ततेचा कालावधी अडीच वर्षापेक्षा कमी असेल तर निवडणूक घ्यावी लागणार नाही.संचालक मंडळ अशी जागा घटनेनुसार योग्य व्यक्तिची निवड करुन स्विकृत करुन जागा भरतील.अशी स्विकृती करण्यासाठी जागा रिक्त झाल्यापासून ३ महिन्याचा कालावधी असेल.असे करण्यास संचालक मंडळास अपयश आल्यास ती जागा भरण्याचा अधिकार मा.निबंधक यांना असेल. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |
| ३४ | | **संचालक मंडळाच्या सभा व त्याची सूचना (नोटीस ):-** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जरुरीप्रमाणे संचालक मंडळाच्या सभा बोलविण्यात याव्यात. मात्र महिन्यातून एक तरी सभा झाली पाहीजे. संचालक मंडळाचे सभेच्या सूचनापत्राबरोबर (नोटीस)सभेची विषयपत्रिका सभेच्या कमीत कमी दोन दिवस अगोदर सर्व संचालकांना पाठविली पाहीजे. मात्र जरुर वाटल्यास तातडीच्या विषयांवर विचार करण्यासाठी तातडीची सभा बोलविण्याचा अधिकार मा.अध्यक्ष यांना राहील. अथवा सर्क्युलर मिटींगने निर्णय घेता येईल . | जरुरीप्रमाणे संचालक मंडळाच्या सभा बोलविण्यात याव्यात. मात्र महिन्यातून एक तरी सभा झाली पाहीजे. संचालक मंडळाचे सभेच्या सूचनापत्राबरोबर (नोटीस)सभेची विषयपत्रिका सभेच्या कमीत कमी दोन दिवस अगोदर सर्व संचालकांना पाठविली पाहीजे. मात्र जरुर वाटल्यास तातडीच्या विषयांवर विचार करण्यासाठी तातडीची सभा SMS/Phone/e-mail व्दारे २ तास आधी सूचना देऊन बोलविण्याचा अधिकार मा.अध्यक्ष यांना राहील. अथवा सर्क्युलर मिटींगने निर्णय घेता येईल . | काळानुसार बदल आवश्यक |
| ३५ | | **गणपूर्ती (कोरम ):-**<br>संचालक मंडळाचे एकुण सभासदापैकी निम्मे संचालक हजर झाले म्हणजे गणपूर्ती (कोरम)झाली असे समजावे. **टिप :-निम्मी संख्या अपुर्णांकांत आल्यास त्याचे पुढील पुर्ण संख्या ही पूर्तीची (कोरमची)संख्या समजावी.** | | |
| ३६ | | **संचालक मंडळाचे अधिकार व कामे :-**<br>संचालक मंडळाचे अधिकार व कामे खालीलप्रमाणे राहतीलः- | | |
| | १) | सभासदत्वाचे अर्जाचा तसेच भाग वाटप व भाग वर्ग करण्यासंबंधी व सभासदत्वाचा राजीनाम्याचे अर्जाचा विचार करणे. | | |
| | २) | बाहेरील केर्ज उभारणेच्या मर्यादेपर्यंत तारणावर / विनातारण कर्ज कॅशक्रेडिट,ओव्हर ड्राप्टस इत्यादी उभारणे व त्यावरील अटी व शर्ती मान्य करणे. | | |
| | ३) | वार्षिक सर्वसाधारण सभापुढे ठेवण्यासाठी वार्षिक ताळेबंद,नफातोटा पत्रके व इतर अनुषंगीक पत्रके मंजूर करणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४) | कर्जे,कॅशक्रेडीट,बिल्स,डिस्कांऊटींगच्या अर्जाचा विचार करणे त्याच्या अटी ठरविणे. | | |
| | ५) | व्यापारी,राष्टीकृत अगर सहकारी बँकेच्या तसेच आर्थिक संस्थांच्या सहभाग योजनेत सामील होणे व त्यासंबंधीत कर्जाच्या अटींचा व शर्तीचा विचार करणे. | | |
| | ६) | सभासदाकडून येणे असलेल्या सर्व प्रकारच्या थकबाकीचा विचार करणे व त्यावरील कारवाई संबंधी निर्णय घेणे. | | |
| | ७) | बँकेने दिलेल्या विविध कर्ज व कॅशक्रेडिटस् व आर्थिक मदतीच्या योजनांचे नियमात व अटीत आवश्यकेतनुसार बदल व सुधारणा करणे,नवीन अटी घालणे अथवा जुन्या अटी रद्द करणे. | | |
| | ८) | सरकारी ऋणपत्रे,विश्वस्त निधी,ठेवी व इतर मान्य केलेल्या तारण पत्रातील गुंतवणूकीस मान्यता देणे. | | |
| | ९) | बँकेसाठी विकत घेतलेल्या,विकलेल्या व तारण ठेवलेल्या राज्य ऋणपत्रे व विश्वस्त संस्थांची ऋणपत्रे याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे व यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व कोणाही एका संचालकास सुंयुक्तपणे याबाबत अधिकार देणे. | | |
| | १०) | शाखा उघडणे संबंधी विचार करणे. | शाखा,विस्तार कक्ष तसेच अेटीएम सेंटर उघडण्यासंबंधी विचार करणे. | अेटीएम सेवेचा समावेश करणेसाठी |
| | ११) | रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कर्जावरील व ठेवीवरील व्याजदर ठरविणे. | | |
| | १२) | कोणत्याही प्रकरणात अगर तंट्याबाबत वाद निर्माण झाल्यास बँकेचे बाजूने अगर विरुध्द असले तरी मे.निबंधक ,सहकारी खाते अगर सहकारी न्यायालयाकडे अथवा योग्य त्या अधिकाऱ्याकडे खास नेमणूक झाली असल्यास सदर प्रकरण नेणे/सुपुर्द करणे. | | |
| | १३) | बँक,संचालक,अधिकारी अगर कर्मचारी यांचे बाजूने अगर विरुध्द होणाऱ्या कायदेशीर कारवाईबाबत ती सुरु करणे,चालु ठेवणे,त्यात तडजोड करणे,ती सोडणे अगर काढून घेणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १४) | दलाल,तज्ञ,सल्लागार,कायदा सल्लागार,व चौकशी अधिकारी अथवा याबाबत कामे करणारी संस्था यांना बँकेच्या व्यवहारासंबंधी कराराने नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे. | | |
| | १५) | बँकेत कर्मचारी,अधिकारी नेमणेबाबत नियम करणे व सदरहू जागा सरळ भरतीने व अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांकडून बढती पध्दतीने नेमणे बाबतची पध्दत निश्चित करणे .त्यांची शैक्षणिक पात्रता,पगार,भत्ते बाबत नियम तयार करणे व शिस्त पालनाबाबतचे नियम करणे. | | |
| | १६) | मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पोटनियम क्र.४०(अ)प्रमाणे नेमणूक करणे व त्यांचे वेतन ठरविणे. | | |
| | १७) | जरुरीप्रमाणे कर्मचारी उपसमिती नेमणे.सदरहू उपसमिती अध्यक्ष,मुख्य कार्यकारी अधिकारी व पाच संचालक अशी राहील. ह्या समितीपुढे कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रश्न,प्रकरणे यांचा विचार केला जाईल. त्यात निवड नेमणूक,प्रशिक्षणे व बढती यांचेबाबत विचार करणे. (मंजूर दि.२४/९/९७) | | |
| | १८) | बँकेसाठी जागा भाडयाने ,खरेदी करणेसाठी करार करणे,त्यासाठी आगाऊ भाडे,ठेव व भरपाईची अथवा तारणासहीत / विरहित दीर्घ मुदतीच्या उचलीची रक्कम ठरविणे. | | |
| | १९) | वार्षिक अर्थ संकल्प तयार करणे व खर्चास मान्यता देणे. | | |
| | २०) | सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारणे. | | |
| | २१) | जरुरीप्रमाणे संचालक मंडळ खालीलप्रमाणे उपसमितीची नेमणूक करील. | | |
| | अ | सात संचालकांपेक्षा जास्त नसेलली उपसमिती /उपसमित्या नेमणे त्यास सहभाग योजनेसंबंधीचे अधिकार व्यतिरिक्त जरुर ते अधिकार देणे.या समितीत अध्यक्ष व मुख्य अधिकारी यांचा समावेश असेल. (मंजूर दि.२४/९/९७) | सात संचालकापेक्षा जास्त नसलेली उपसमिती /उपसमित्या नेमणे त्यास सहभाग योजने संबंधीचे अधिकारा व्यतिरिक्त जरुर ते अधिकार देणे.या समितीत अध्यक्ष व मुख्य अधिकारी असतील तसेच संचालक मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे त्या समितीचे पदसिध्द सदस्य राहतील. | अर्थ स्पष्ट होणेकरीता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब | मुख्य कार्यालयाचे गावापासून २५ कि.मी.पेक्षा दूर असलेल्या शाखांकरीता शाखा समिती नेमणे व त्या समितीस कर्जमंजूरीसह योग्य वाटतील ते अधिकार देणे.शाखा समिती खालील प्रमाणे राहील. | | |
| | १) | संचालक मंडळाचे अध्यक्ष (२)शाखा परिसरातील संचालक सभासद (३)दोन भागधारक -शाखा परिसरातील सभासद (४) मुख्य कार्यकारी अधिकारी सभासद -सचिव | | |
| | क | | **तक्रार निवारण व तडजोड समितीः-** सभासद व संस्था यांचेमध्ये वेळोवेळी होणारे वाद तक्रारी यांचे निराकरण करणेसाठी तसेच संस्थेचे थकबाकीदार आणि संस्था यांचेमधील वाद मिटविण्यासाठी /तडजोडीसाठी सर्व साधारण सभा वरील समितीची स्थापना करील. **समितीची रचना पुढीलप्रमाणे :-** एकुण तीन क्रियाशील सभासद समितीचे सदस्य असतील पैकी जे जेष्ठ,सहकार संस्थेच्या कामकाजाचा अनुभव असलेले क्रियाशील सभासद समिती अध्यक्ष राहतील व इतर दोन सभासद समिती सदस्य की ज्यांना बँकिंग क्षेत्र,आर्थिक क्षेत्र तेसच व्यावसायिक अनुभव असेल,अशा समितीची महिन्यातून किमान एक सभा होईल.समिती समोर आलेल्या वादामध्य संस्थेस योग्य सल्ला देणे तसेच कायदा,नियम,उपविधी ,सहकार खात्याचे आदेश,इतर तत्वे यांचा विचार करुन तडजोड घडवून आणणे हे काम राहील. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २२) | मुख्य कार्यकारी अधिकारी अगर इतर अधिकाऱ्यांना ठराविक मर्यादेपर्यंत कर्जे व उचल मंजूर करण्याचे अधिकार देणे,तसेच कायदेशीर कारवाईमध्ये बँकेचे वतीने त्यात भाग घेण्याचे अधिकार देणे. | | |
| | २३) | संचालक मंडळाचे निवडणूकी संबंधीची तयारी करणे. | | |
| | २४) | कायदा कलम ७०(ड)यास पात्र राहून बँकांतून खाती उघडणे,ठेवी ठेवणे व त्यावर तसेच आर्थिक संस्थांबरोबर असे व्यवहार करण्याचे अधिकार बँकेचे अधिकाऱ्याना देणे. | | |
| | २५) | संचालक मंडळावरील तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा स्विकृत पध्दतीने भरणे. | रद्द | उपविधी क्र.३३ मध्ये यासंदर्भात तरतूद असल्याने. |
| | २६) | योग्य त्या संस्थांचे सभासदत्व घेणे व संलग्न होणे. | | |
| | २७) | भविष्यनिर्वाह निधी चालू करणे व त्यास उत्तेजन देणे. | सरकारच्या नियमानुसार भविष्य निर्वाह निधीबाबत योग्य ती पूर्तता करणे. | संबंधित कायद्यातील बदलामुळे |
| | २८) | आवश्यकतेनुसार विविध संस्थांचे वार्षिक सभांना प्रतिनिधी पाठविणे,त्यांच्या समितीवर /संचालक मंडळावर प्रतिनिधी पाठविणे तसेच जरुरीप्रमाणे विविध स्तरांवरील होणाऱ्या चर्चा सभासाठी,अधिवेशनासाठी प्रतिनिधी पाठविणे. | | |
| | २९) | खालील बाबतीत वेळोवेळी नियम करणे,त्यात सुधारणा करणे,रद्द करणे ,बदल करणे | | |
| | अ | सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारणे. | | |
| | ब | बँकिंग व्यवहार,कर्जे व अनुषंगिक व्यवहार | | |
| | क | संचालकांचे व कर्मचाऱ्यांचे प्रवासभत्ते व इतर भत्ते | | |
| | ड | भविष्यनिर्वाह निधी,ग्रॅच्युईटी व बोनस | | |
| | इ | संचालक मंडळाची निवडणूक | | |
| | फ | कर्मचाऱ्यांची भरती | | |
| | ग | कर्मचाऱ्यांसाठी सेवा नियम<br>वरील निवडणूक विषयी केलेल्या नियमास सर्वसाधरण सभेची संमती घ्यावी लागेल.कर्मचाऱ्यांची भरती संबंधीचे व सेवानियमास मे.निबंधकाची मंजूरी घ्यावी लागेल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३०)<br>३१)<br>३२) | बँकेचे उद्देशास अनुसरुन व्यवहार अंगीकरणे व त्यासाठी प्रशासकीय दृष्टया आवश्यक लागणाऱ्या कृती करणे.<br>पोटनियम दुरुस्ती बाबत विचार करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे. | विविध कर्जविषयक नियम ठरविणे,धोरण ठरविणे,सर्वसामान्य स्वरुपाचे नियम व धोरण ठरविणे. | नविन कामकाज पध्दतीमुळे |
| ३७) | | बँकेच्या कामकाजासंबंधी संचालक मंड़ळाने अगर संचालकाने घेतलेले निर्णय चांगल्या भावनेने व विश्वासाने घेतलेले असतील तर ते केवऴ सदरहू संचालक अगर संचालक मंड़ळाचे नेमणूकीत दोष आढवला म्हणून अवैध ठरणार नाहीत तर ते निवडून आलेल्या नेमणूक अगर स्वीकृत झालेल्या मंड़ळानेच केलेले आहेत असे धरुन वैध ठरतील. | | |
| ३८) | | संचालक मंड़ळाचे /उपसमितीचे सभा इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या पुस्तकात नोंदले जाईल. सदरहू पुस्तकांच्या प्रत्येक पानावर क्रमांक टाकणे आवश्यक आहे. इतिवत्तावर त्या सभेच्या अध्याक्षांनी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांने सह्या केल्या पाहिजेत. | | |
| ३९) | | **अध्यक्षांचे अधिकार व कामे खालील प्रमाणे राहतील.** | **अध्यक्षांचे अधिकार व कामे खालील प्रमाणे** | |
| | अ | संचालक मंड़ळ, उपसमित्या व इतर नेमलेल्या समित्यांच्या सभेचे अध्यक्षपद भुषविणे. | बँकेच्या सर्वसाधारण कामांवर लक्ष ठेवणे. | समिती,उपसमित्यासाठी अध्यक्षपद असल्या कारणाने |
| | ब | बँकेच्या सर्वसाधारण कामांवर देखरेख ठेवणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०) | अ) | **मुख्य कार्यकारी अधिकारी :-**<br>संचालक मंडळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक पोटनियम क्रमांक ३६(२९) नुसार तयार केलेल्या कर्मचाऱ्यांच्या भरतीचे नियमानूसार करतील.तसेच त्यांना नोकरीतून काढण्यासंबंधीचा निर्णय पोटनियम क्रमांक ३६(२९) ग नुसार तयार केलेल्या सेवानियमानुसार घेण्यात येईल. | **मुख्य कार्यकारी अधिकारी :-**<br>मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती मा.संचालक मंडळ सेवा नियमांच्या अंतर्गत करेल व तो बँकेचा पूर्णवेळ पगारी नोकर राहील.मुख्य कार्यकारी अधिकारी हा कार्यलक्षी संचालक म्हणून संचालक मंडळावर असेल. | |
| | ब) | मुख्य कार्यकारी अधिकारी हे संचालक मंडळास जबाबदार राहतील. त्यांची कामे व अधिकार खालीलप्रमाणे राहतील. | संचालक मंडळाच्या निर्देशानुसार खालील कामे मुख्य कार्यकारी अधिकारी करेल. | |
| | १) | सर्वसाधारण सभेने व संचालक मंडळाने संमत केलेल्या ठरावांची व निर्णयांची अंमल बजावणी करणे. | सर्वसाधारण सभेने व संचालक मंडळाने संमत केलेल्या ठरावांची व निर्णयांची अंमल बजावणी करणे. | |
| | २) | मा.चेअरमन यांचे सूचनेवरुन सर्वसाधारण सभा,संचालक मंडळाची सभा, उपसमित्यांच्या सभा बोलावणे व त्यास हजर राहून त्यांचा वृतांत इतवृित्त पुस्तकात नोंदवून त्यावर अध्यक्षांसह स्वाक्षऱ्या करणे. | मा.चेअरमन यांचे सूचनेवरुन सर्वसाधारण सभा,संचालक मंडळाची सभा, उपसमित्यांच्या सभा बोलावणे व त्यास हजर राहून त्यांचा वृतांत इतवृित्त पुस्तकात नोंदवून त्यावर अध्यक्षांसह स्वाक्षऱ्या करणे. | |
| | ३) | बँकेच्या वतीने पत्रव्यवहार करणे. | बँकेच्या वतीने पत्रव्यवहार करणे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ४) | रिझर्व बँक ,कर्ज पुरवठा करणारी वरिष्ठ संस्था यांचे सुचनेप्रमाणे व सहकारी कायदा व नियमाखाली आवश्यक असलेली हिशोब पुस्तके रजिस्टर्स ठेवणे. | रिझर्व बँक ,कर्ज पुरवठा करणारी वरिष्ठ संस्था यांचे सुचनेप्रमाणे व सहकारी कायदा व नियमाखाली आवश्यक असलेली हिशोब पुस्तके रजिस्टर्स ठेवणे. | |
| | | ५) | नाममात्र सभासदासाठी आलेल्या अर्जाचा विचार करणे व त्यावर निर्णय घेणे. | | |
| | | ६) | सभासदत्वासाठी व ज्यादा भाग (शेअर )मागणीचे अर्ज स्विकारुन त्यावर शेरे व शिफारस लिहून संचालक मंडळापुढे निर्णयासाठी ठेवणे. | सभासदत्वासाठी व ज्यादा भाग (शेअर )मागणीचे अर्ज स्विकारुन त्यावर शेरे व शिफारस लिहून संचालक मंडळापुढे निर्णयासाठी ठेवणे. | |
| | | ७) | कर्ज मागणीचे अर्ज स्विकारुन त्यावर सविस्तर टिपणी करुन शिफारसीसह संचालक मंडळ अगर उपसमित्यांपुढे निर्णयासाठी ठेवणे. | वगळणे. | यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल. |
| | | ८) | सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारण्याची व्यवस्था करुन त्यापोटी पावती पत्रके व पासबुके देण्याची व्यवस्था /सुचना करणे. | सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारण्याची व्यवस्था करुन त्यापोटी पावती पत्रके व पासबुके देण्याची व्यवस्था /सुचना करणे. | |
| | | ९) | बँकेच्या वतीने पैशाचे वाटप व निधीची गुंतवणुक करणे. | बँकेच्या वतीने पैशाचे वाटप व निधीची गुंतवणुक करणे. | |
| | | १०) | रोख शिल्लक,स्थावर व जंगम मालमत्ता,दस्तऐवज ,सिक्युरिटीज,वगैरे ताब्यात घेण्याची /सांभाळण्याची व्यवस्था करणे. | रोख शिल्लक,स्थावर व जंगम मालमत्ता,दस्तऐवज ,सिक्युरिटीज,वगैरे ताब्यात घेण्याची /सांभाळण्याची व्यवस्था करणे. | |
| | | ११) | हाताखालील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संबंधीचे ‌आदेश संचालक मंडळ / कर्मचारी समिती यांचेकडून घेऊन त्याची अंमलबजावणी करणे. मात्र कर्मचाऱ्यांची संख्या एकुण मंजूर संख्येपेक्षा जास्त असणार नाही.तसेच त्यांची वेत श्रेणी व भत्ते संचालक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे असतील. | हाताखालील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संबंधीचे ‌आदेश संचालक मंडळ / कर्मचारी समिती यांचेकडून घेऊन त्याची अंमलबजावणी करणे. मात्र कर्मचाऱ्यांची संख्या एकुण मंजूर संख्येपेक्षा जास्त असणार नाही.तसेच त्यांची वेत श्रेणी व भत्ते संचालक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे असतील. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १२) | कर्मचारी वर्गामध्ये कामची वाटणी करणे,कामकाज सोपविणे व त्यावर देखरेख करणे. | कर्मचारी वर्गामध्ये कामची वाटणी करणे,कामकाज सोपविणे व त्यावर देखरेख करणे. | |
| | | १३) | स्टॅडींग ऑर्डर्स / सेवानियमानुसार शिस्तपालनासाठी योग्य ती कारवाई कर्मचारी वर्गावर करणे. | स्टॅडींग ऑर्डर्स / सेवानियमानुसार शिस्तपालनासाठी योग्य ती कारवाई कर्मचारी वर्गावर करणे. | |
| | | १४) | जरुरीप्रमाणे जेथे आवश्यक असेल तेथे कर्मचाऱ्यांची बदली करणे. | जरुरीप्रमाणे जेथे आवश्यक असेल तेथे कर्मचाऱ्यांची बदली करणे. | |
| | | १५) | कर्मचारी वर्गाचे रजेचे अर्ज,प्रवास भत्ता बील,वैद्यकीय बीले,व इतर संमत केलेल्या विषयांशी बिले यावर निर्णय देणे. | कर्मचारी वर्गाचे रजेचे अर्ज,प्रवास भत्ता बील,वैद्यकीय बीले,व इतर संमत केलेल्या विषयांशी बिले यावर निर्णय देणे. | |
| | | १६) | संचालक मंडऴाने मंजूर केलेल्या मर्यादेत अंदाजपत्रकाचे मंजूरीस पात्र राहून खर्च करणे. | संचालक मंडऴाने मंजूर केलेल्या मर्यादेत अंदाजपत्रकाचे मंजूरीस पात्र राहून खर्च करणे. | |
| | | १७) | उपलब्ध निधीची संचालक मंडळाचे धोरणानुसार गुंतवणुक करुन संचालक मंडऴाचे पुढील सभेत त्याची माहीती देणे. | उपलब्ध निधीची संचालक मंडऴाचे धोरणानुसार गुंतवणुक करुन संचालक मंडऴाचे पुढील सभेत त्याची माहीती देणे. | |
| | | १८) | संचालक मंडऴाने अथवा अध्यक्षांने दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे / कार्यवाही करणे. | संचालक मंडऴाने अथवा अध्यक्षांने दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे / कार्यवाही करणे. | |
| | | १९) | ठेवी,सोने चांदीचे दागीने यांचे तारणावर व सरकारी कर्जरोख्यांपोटी संचालक मंडऴाने ठरवून दिलेल्या मर्यादित कर्ज मंजूर करणे.तसेच स्थावर मालमत्तेखेरीज संचालक मंडऴाने संमत केलेल्या इतर तारणापोटी नियमाप्रमाणे रु.५०००/- पर्यंत कर्ज मंजूर करणे.मात्र अशा मंजूर केलेल्या कर्जाचे पत्रक संचालक मंडऴाचे सभेत सादर केले पाहीजे. | वगळणे. | अशा प्रकारची कर्जे मंजूरीचे अधिकार शाखा प्रमुखांना आहेत. |
| | | २०) | कायदेशीर कारवाईत बँकेचे प्रतिनिधित्व करणे. | कायदेशीर कारवाईत बँकेचे प्रतिनिधीत्व करणे अथवा अधिकार प्रदान करणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४१ | | **कर्ज व्यवहार :-** | | |
| | अ) | सभासदांना खाली निर्देशित केल्याप्रमाणे विनातारण किंवा तारणापोटी किंवा संचालक मंडळाने मान्य केलेल्या इतर तारणापोटी किंवा तारणाशिवाय कर्ज,कॅशक्रेडिटस् व करंट खात्यावर ओव्हरड्राप्ट मंजूर केले जातील. मात्र ह्याबाबत रिझर्व बँकेकडून वेळोवेळी येणाऱ्या कर्जे व्यवहाराचे आदेशाचे पालन करावे लागेल.तसेच अर्ज करणाऱ्या सभासदांनी इतर नागरी सहकारी बँका / संस्था अथवा पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थांकडून कर्ज घेतलेले नसावे. | | |
| | १ | व्यक्तीगत तारण अगर इतर सभासदांची जामीनकी. | | |
| | २ | स्थावर अथवा जंगम मालमत्तेचे सहतारण (कोलॅटरल) | | |
| | ३ | औद्योगिक माल,व्यापारी माल,शेती माल अगर इतर बाजार मूल्य असलेल्या वस्तू,मशिनरी यांचे ताबेगहाण ,नजरगहाण व इतर प्रकारे बोजा निर्माण करुन, | | |
| | ४ | सरकारी कर्ज रोखे,विश्वस्त संस्थांचे कर्जरोख संमत केलेल्या कंपनीचे भाग,डिबेंचर्स व याच बँकेतील ठेवी यांचे तारणावर . | | |
| | ५ | विमा पॉलसीचे तारणावर (सरेंडर व्हॅल्यू पोटी) | | |
| | ६ | वखार पावतीचे तारणावर | | |
| | ७ | सोन्या चांदीचे दागिण्याचे तारणापोटी | | |
| | ८ | कोणत्याही इतर दृष्य तारणापोटी | | |
| | ब | याच बँकेत ठेवलेल्या मुदत ठेवीच्या तारणापोटी सभासदास / नामधारी सभासदास कर्ज /आव्हरड्राप्ट मंजूर करणेस हरकत नाही. | | |
| | क | संचालक मंडळाने कर्ज,कॅशक्रेडिटस् व ओव्हरड्राप्टस मंजूर करण्यासंबंधीचे सविस्तर नियम तयार करावेत. हे नियम करतांना त्यात कर्ज देण्याची पध्दत ,दुरावा,विनातारण कर्जाचे प्रमाणे,कर्जाच्या अटी व नियम (तारणानुसार )यांचा समावेश असला पाहीजे. तसेच असे नियम करताना रिझर्व बँकेचे वेळोवेळी आलेल्या आदेशाचे पालन होईल हे पाहीले पाहीजे. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ड | सर्व कर्जाच्या व्यक्तीशः व कमाल मर्यादा रिझर्व बँकेच्या डायरेक्टिव्हज् प्रमाणे व कर्ज नियमाप्रमाणे राहतील. कर्जाचे हप्ते ,व्याज इ.बँकेने ठरविलेल्या ठराविक मुदतीत नियमितपणे न भरल्यास संचालक मंडळाने ठरविलेल्या कर्जावर ठरलेल्या व्याजदारव्यतिरिक्त द.सा.द.शे.२%पेक्षा ज्यादा नाही अशा दराने दंडव्याज (पिनल इंटरेस्ट) आकरण्यात येईल.व ते कर्ज खाती नांवे टाकण्यात येईल.जर कर्जदाराने बँकेने ठरविलेल्या ठराविक मुदतीत कर्जाचे हप्ते व तिमाही व्याज भरेल असेल तर संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविलेल्या कर्जाच्या व्याजदरात सूट (रिबेट)दिली जाईल. ठराविक मुदत म्हणजे कर्ज खात्यावर व्याज नावे टाकल्यापासून १५ दिवस.व्याजाची सूचना मिळाली नाही ही सबब ग्राहय धरील जाणार नाही. (वा.सा.सभा दि.४/११/९३०(मंजूर आदेश दि.१२/१/९४) | सर्व कर्जाच्या व्यक्तीशः व कमाल मर्यादा रिझर्व बँकेच्या डायरेक्टिव्हज् प्रमाणे व कर्ज नियमाप्रमाणे राहतील. कर्जाचे हप्ते ,व्याज इ.बँकेने ठरविलेल्या ठराविक मुदतीत नियमितपणे न भरल्यास संचालक मंडळाने ठरविलेल्या कर्जावर ठरलेल्या व्याजदारव्यतिरिक्त द.सा.द.शे.२%पेक्षा ज्यादा नाही अशा दराने दंडव्याज (पिनल इंटरेस्ट) आकरण्यात येईल.व ते कर्ज खाती नांवे टाकण्यात येईल.जर कर्जदाराने बँकेने ठरविलेल्या ठराविक मुदतीत कर्जाचे हप्ते व मासिक व्याज भरेल असेल तर संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविलेल्या कर्जाच्या व्याजदरात सूट (रिबेट)दिली जाईल. ठराविक मुदत म्हणजे कर्ज खात्यावर व्याज नावे टाकल्यापासून १५ दिवस.व्याजाची सूचना मिळाली नाही ही सबब ग्राहय धरील जाणार नाही. (वा.सा.सभा दि.४/११/९३०(मंजूर आदेश दि.१२/१/९४) | कर्जावर मासिक व्याज आकराले जात असल्याने |
| | | इ | | बँक क्रेडीट इन्फरमेशन कंपनीचे (CIBIL)सभासद असल्याने कर्जमंजूरीपुर्वी त्या कंपनीचा अहवाल घेण्यात यावा. | नविन परिस्थितीनुसार समावेश करण्यासाठी |
| | | | **टीप :-** | | |
| | | १) | या पोटनियमात काहीही नमूद केलेले असले तरी सर्व कर्जाच्या व्यक्तीशः व एकूण मर्यादा रिझर्व बँक ऑफ इंडियाचे डायरेक्टीव्हज प्रमाणे राहतील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २) | एका सभासदास मंजूर केलेली सर्व प्रकारच्या कर्जाची रक्कम ही बँकेच्या टी.डी.एल.च्या (टाईम एन्ड डिमांड लायबिलीटीज)५%पेक्षा जास्त असणार नाही .ह्या कारणासाठी बँकेच्या ठेवीवरील कर्जे,सरकारी व विश्‍वस्त रोख्यांच्या तारणावरील कर्जे वगळण्यात यावी म्हणजे अशी कर्जे ५%टी.डी.एल.च्या मर्यादेत धरली जाणार नाहीत. | | |
| | ३) | सर्व प्रकारच्या कर्जासाठी रिझर्व बँक वेळोवेळी ठरविल त्या पेक्षा कमी शेअर लिकींग ठेवले जाणार नाही. | | |
| | ४) | जर कर्जदाराने बँकेने ठरविलेल्या ठराविक मुदतीत कर्जाचे हप्ते ,तिमाही व्याज भरले असेल तर त्यास व्याजात १टक्का अथवा संचालक मंडळ ठरविल त्यादराने सूट (रिबेट) दिली जाईल. ठराविक मुदत म्हणजे व्याज नावे टाकल्यापासून १५ दिवस.व्याजाची सूचना मिळाली नाही ही सबब ग्राहय धरली जाणार नाही. (मंजूर दि.२४/०९/२००१) | रद्द | उपविधी क्र.४१(ड) मध्ये उल्लेख आहे. |
| | ५) | जर कर्जाचे हप्ते व व्याज हे ठराविक वेळेत कर्जदाराने भरेल नसेल तर त्या कर्जावर ठरलेल्या व्याजदराव्यतिरिक्त २टक्के इतके जास्त दंडव्याज (पेनल्टी इंटरेस्ट) आकरण्यात येईल. | रद्द | उपविधी क्र.४१(ड) मध्ये उल्लेख आहे. |
| ४२ | | **भाग भांडवलाची कर्जाशी सांगड :-** रिझर्व बँकेने वेळोवेळी ठरविल्यापेक्षा कमी नाही इतक्या रकमेचे भाग कर्जदारास कर्ज मंजूर रकमेच्या प्रमाणात धारण करणे आवश्यक आहे.मात्र असे भाग धारण करण्याची मर्यादा सहकारी कायद्याचे तरतुदीनुसार मर्यादित केली जाईल. | | |
| ४३ | | **ठेवी :-** | | |
| | अ | कायदा व नियम यांनी ठरवून दिलेल्या मर्यादेत,बँकेस ठेवी स्विकारता येतील. ठेवीवरील व्याजाचे दर व त्यासंबंधीच्या अटी संचालक मंडळाने मान्य केल्याप्रमाणे व रिझर्व बँकेचे वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार राहतील. | | |
| | ब | चालू,बचत,मुदत,आवर्तक,संचयित व इतर विविध खास ठेव योजनेखाली ठेवी स्विकारल्या जातील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | | **नफा वाटणी :-** | | |
| | १) | सहकारी संस्था कायदा व नियम यास अनुसरुन बँकेचा निव्वळ नफा काढला जाईल. | | |
| | २) | संचालक मंडळाचे शिफारशीनसार निव्वळ नफ्याचीस वाटणी सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल. | | |
| | अ) | सहकारी कायद्याचे तरतुदीनुसार २५टक्के पेक्षा कमी नाही इतका नफा वैधानिक राखीव निधीस जमा केला जाईल. | | |
| | ब) | सहकारी कायद्यातील तरतुदीत नमूद केलेल्या कमाल मर्यादेस पात्र राहून लाभांश देणयासाठी तरतूद केली जाईल. | | |
| | क) | वरीलप्रमाणे रकमा वजा केल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील तिची विभागणी खालील प्रकारचे निधीत करावी. | | |
| | १ | सभासद बेनिफंट फंड | | |
| | २ | स्टाफ बेनिफिट फंड | | |
| | ३ | स्थानिक विकास निधी | | |
| | ४ | धर्मादाय निधी | | |
| | ५ | उत्सव निधी | | |
| | ६ | इमारत निधी | | |
| | ७ | गुंतवणुक चढ उतार निधी | | |
| | ८ | महिला कल्याण निधी (मंजूर आदेश दि.२७/१२/२००६) | | |
| | | वरील प्रमाणे विभागणी केल्यानंतर नफ्यातील जो भाग शिल्लक राहील तो जनरल फंडात वर्ग केला जाईल. (वा.स.सभा दि.०५/०९/९६)(मंजूर दि. १३/११/९६) | वरील प्रमाणे विभागणी केल्यानंतर नफ्यातील जो भाग शिल्लक राहील तो पुढील वर्षाकरिता वर्ग करण्यात येईल. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४५ | | **राखीव निधी :-** | | |
| | १) | सहकारी कायदा,नियम व पोटनियम यात नमूद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत प्रवेश फी ,नाममात्र सभासद फी,भाग वर्ग करण्याची फी,जप्त केलेल्या भागाची रक्कम ,जप्त केलेल्या लाभांशाची रक्कम व देणग्या या रकमा जमा केल्या जातील. | | |
| | २) | रिझर्व फंडातील गुंतवणूक सरकारी कर्जरोक्यात,विश्वस्त कर्ज रोख्यात अथवा इतर मान्यता प्राप्त सिक्युरिटीज अगर राज्य सहकारी बँक /जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या मुदत ठेवीत स्वतंत्रपणे करण्यात येईल. | | |
| ४६ | | **लाभांश :-** | | |
| | १) | लाभांशाची रक्कम ही ज्या सहकारी वर्षाशी संबंधीत असेल त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी सदरहू भाग ज्याचे नावाने बँकेचे पुस्तकात असेल त्यास देण्यात येईल. | | |
| | २) | भाग धारकाची रक्कम जितेक महिने असेल त्याप्रमाणात तसेच भागाचे प्रमाणात लाभांश दिला जाईल. | | |
| | ३) | लाभांशाची रक्कम बँकेच्या मुख्य कचेरीत व शाखात दिली जाईल. | | |
| | ४) | लाभांश जाहिर केल्यानंतर तिन वर्षात न नेल्यास ती रक्कम जप्त करुन राखीव निधीत जमा केली जाईल. | | |
| | ५) | न घेतलेला लाभांश अर्ज केल्यानंतर दिला जाईल. मात्र तो लाभांश जप्त केलेला नसावा. | | |
| | ६) | | भागधारकाचे कर्जखाते असल्यास लाभांश रक्कम त्यात वर्ग करणे अन्यथा बचत / चालू खात्यात वर्ग करणे. | लाभांश वाटपाच्या सोयीसाठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७ | | **दप्तर व हिशोब :-**<br>बँकेतील व्यवहाराबद्दलेच दप्तर व हिशोब मे.निंबधक ,सहकारी संस्था,व रिझर्व बँक यांनी ठरवून दिलेल्या व मान्य केलेल्या नमुन्यात ठेवले जातील. तसेच संचालक मंडळास जरुरी वाटल्यास जादा पुस्तके ठेवली जातील .बँकेचा कोणताही सभासद त्याचे संबंधीत व्यवहाराविषयी हिशेब व रजिस्टर्स बँकेच्या कामकाजाचे वेळात पाहू शकतील. | | |
| ४८ | | **लेखा परिक्षा :-**<br>सहकारी कायदा कलम ८१ नुसार मे.निबंधकांनी नेमलेल्या लेखा परिक्षकाकडून बँकेचे हिशोब तपासले जातील. | बँकेच्या दरवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ती सभा ज्या आर्थिक वर्षात होत आहे त्या वर्षीच्या लेखापरीक्षकाची नेमणूक करण्याचा अधिकार त्या वार्षिक सर्व साधारण सभेस राहील.तथापी मा.निबंधक यांनी जाहीर केलेल्या लेखापरीक्षकांच्या यादीतील एकाची किंवा फर्मची नेमणूक करावी लागेल.तेसच कोणत्याही १० वर्षाच्या काळात तो व्यक्ति किंवा फर्म यांना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लेखा परीक्षक म्हणून नेमता येणार नाही. | ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार |
| ४९ | | **बँकेचे मोहर (सील ):-**<br>बकेचे एक मोहर (सील)तयार करण्यात येईल व ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे ताब्यात राहील. सदरहू मोहर (सील )संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरले जाईल. | | |
| ५० | १) | **पोटनियमाची दुरुस्ती :-**<br>ह्या पोटनियमातील कोणत्याही कलमामध्येबदल ,दुरुस्ती ,वाढ अगर रद्द करण्यासाठी सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या २/३सभासदांनी ठराव मंजूर करणे आवश्यक आहे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २) | वरील (११) प्रमाणे मंजूर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी मे.निबंधताची लेखी मंजूरी आल्यावर आलेल्या तारखेपासून होईल. | वरील प्रमाणे मंजूर झालेल्या पोटनियमांची अमंलबजावणी मे.निबंधकांची लेखी मंजूरी आल्यावर आलेल्या तारखेपासून होईल. | |
| ५१ | | **इतर :-** | | |
| | १) | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक,नागरी बँकांची सह.बँक (अपेक्स बँक )व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बँकेस सभासद होता येईल. (मंजूर दि.२४/९/२००१) | | |
| | २) | खालील संस्थांची बँक वर्गणीदार सभासद होऊ शकेल. | | |
| | अ) | नागरी सहकारी बँकाचे राज्य /राष्ट्रीय स्तरावरील फेडरेशन/असोसिएशन. | | |
| | ब) | नागरी सहकारी बँकाचे प्रादेशिक /जिल्हा फेडरेशन/ असोसिएशन | | |
| | क) | महाराष्ट्र राज्य सहकारी संघ /जिल्हा सहकारी बोर्ड | | |
| | ड) | इंडियन इन्स्टटयूट ऑफ बँकर्स | | |